Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# जल व्यवस्थापन एक गरज

**प्रा.डॉ.मीना भगवानराव बोर्डे**
सहयोगी प्राध्यापक
जालना समाजकार्य महाविद्यालय.
रामनगर, जालना.
Mail: mborde77@gmail.com
मो.क्रं. 9552585287

**प्रस्तावना:**

नैसर्गिक साधन संपत्ती मधील सजीवांसाठी अनन्यसाधारण पाणी हे महत्त्वाचे घटक आहे. "पाणी म्हणजे जीवन." वाढती लोकसंख्येसाठी पिण्याचे पाण्यासाठी, दैनंदिन वापरासाठी, शेती, उद्योग धंद्यासाठी पाण्याची मागणी वाढत आहे. त्यामुळे पाण्याची गरज भागविण्यासाठी व भविष्यकालीन जलसाठे स्वच्छ ठेवण्यासाठी जलव्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे आहे. मानवाने उपलब्ध असलेल्या पाण्याचे नियोजन करणे आवश्यक आहे. त्यात पाण्याचा उपयोग, पुनर्वापर करणे व नैसर्गिक पाण्याच्या स्रोतांचे जतन व संरक्षण करणे अत्यंत गरजेचे आहे. पाण्याच्या जलव्यवस्थापनाच्या संदर्भात सातत्याने समाजात जनजागृती करणे आवश्यक आहे.

राष्ट्रकुल 2005-2015 हे दशक पाण्याचे दशक म्हणून जाहीर केले. मानवाकडून पाण्याची होणारी उधळपट्टी आणि पाण्याचे होणारे गैरव्यवस्थापनमुळे एकीकडे दुष्काळ आणि दुसरीकडे पूर उपस्थित निर्माण करते. पाण्याच्या गैरव्यवस्थापनामुळे पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात मानवाला भेडसावत आहे.

**अभ्यासाचे उद्देश:**

1. जल व्यवस्थापन व कृषी विकास यांची माहिती घेणे.
2. जल व्यवस्थापनाचा अभ्यास करणे.
3. जल व्यवस्थापनासाठी उपाय सुचविणे.

**अध्ययन पद्धती:**

प्रस्तुत अभ्यास हा जल व्यवस्थापनावर अवलंबून आहे. यात दुय्यम साधनसामुग्रीचा उपयोग करण्यात आला आहे.

**जल व्यवस्थापन व शासनाचे ध्येय धोरणे :**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अनेक कायदे करण्यात आले. त्या जलसंवर्धन संरक्षण संदर्भात योजना राबविल्या. विविध कायदे केले. काही प्रकल्प राबविले. भाक्रा-नांगलसारखी धरण योजना राबवून पाणी साठवण्याबरोबरच जलविद्युत निर्मितीवर भर दिला. तलाव, धरणे, तळी आदी पाणी साठ्याचे प्रमाण वाढविण्यावर भर दिला.

महाराष्ट्र शासन हे पाणीपुरवठ्याबाबत विविध महामंडळे स्थापन करून पाण्याचे व्यवस्थापन केले. त्यात कृष्णा खोरे प्रकल्प, कोकण पाटबंधारे, तापी पाटबंधारे, गोदावरी विकास महामंडळ, विदर्भ पाटबंधारे महामंडळाद्वारे पाणी अडविण्याचे धोरण स्वीकारले आहे. राज्याने आतापर्यंत स्वजलधारा, भारत निर्माण राष्ट्रीय पेयजल योजना, ग्रामीण पाणी पुरवठा, जवाहर विहीर योजना तसेच मध्यम प्रकल्प, पाटबंधारे अशा विविध योजना राबविलेल्या आहे. या सर्व योजनांचा विचार करता महाराष्ट्रात आजही पाणीटंचाई का असा प्रश्न पडतो.

**जल व्यवस्थापन पाणीटंचाईची कारणे:**

वाढत्या लोकसंख्येमुळे अन्ननिर्मिती, पाण्याचे पाणी, मूलभूत गरजा, औद्योगीकरण इत्यादीला मोठ्या प्रमाणात पाणी लागते. स्पर्धेच्या युगात प्रत्येक देश स्पर्धा करीत आहे. त्यामुळे जमीनीतल्या पाण्याचा फार मोठा उपसा होत आहे. इतर देशाचा विचार केला तर भारतातील शेतकऱ्यात जलव्यवस्थापनाच्या बाबतीत ज्ञान देण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणात झालेला दिसून येत नाही. भारतीय शेतकरी ठिबक सिंचन, स्प्रिंकलर यांचा वापर कमी करत आहेत. भारतात पावसाचे पाणी जमीनीत न मुरता समुद्राला जात आहे. उलट ते पाणी जमीनीची माती घेऊन जात आहे. त्यामुळे भूजल खोल जात आहे. त्याचबरोबर प्रत्येक व्यक्तीने पाण्याचे नियोजन करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण आज भारतात प्रत्येक माणूस पाणी किती वापरायला पाहिजे याकडे दुर्लक्ष करतो. छोट्या मोठ्या कामासाठी जास्तीचे पाणी वापर करतो. पाणी टंचाईचे मुख्य कारण म्हणजेच पाण्याचे योग्य व्यवस्थापन केले जात नाही.

महाराष्ट्र शासनाने जलस्वराज, राष्ट्रीय पेयजल योजना इत्यादी योजना वापरुन विदर्भात, मराठवाड्यात कोटी रुपये खर्च केले तरी पाणी टंचाईवर मात करता आलेली नाही. याचा परिणाम महाराष्ट्रातील खेड्यापाड्यातील महिलांना आजही पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. त्यामुळे शेतीचा विकास पाहिजे त्या प्रमाणात झालेला नाही.

**उपाययोजना:**

जल व्यवस्थापनाच्या अभावामुळे राज्यात मुबलक पाणीसाठा असूनही आणि टंचाईचा सामना करावा लागत आहे. राज्यात विहिर, कुपनलिका मार्फत पाणी अमर्याद उपश्यामुळे पाणी पातळी खोल गेली आहे. जल व्यवस्थापनासाठी काही उपाययोजना करणे गरजेचे आहे.

1. ;पाणी आडवा पाणी जिरवा' या प्रकारचे कार्यक्रम सर्वत्र मोठ्या पातळीवर घ्यावेत.
2. मोठमोठी धरण न बांधता लहान-लहान धरणे बांधवीत.
3. शेतकऱ्यांनी आपापल्या शेतात लहान तळी निर्माण करावीत. त्यामुळे शेततळ्यामध्ये पाणी साठविता येईल.
4. पाणी टंचाई असूनही सवयीप्रमाणे पाण्याचा अतिरिक्त वापर केला जातो. त्यासाठी पाण्याचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.
5. अशुद्ध पाणी शुद्ध करून त्याचा वापर शेती व इतर उपयोगासाठी जावा.
6. धरणे, तलाव, तळी इत्यादी स्त्रोतांमध्ये गाळ काढणे.
7. पावसाचे पाण्याचे नियोजन करणे आवश्यक आहे.
8. ठिबक सिंचन, तुषार सिंचन पद्धत राबविणे.
9. शासनामार्फत ज्या विविध योजना राबविल्या जातात. त्यामुळे जल व्यवस्थापनास अग्रक्रम दिला पाहिजे. त्यासाठी दुष्काळ, अतीपर्जन्य, उपलब्ध जलसाठे, पाण्याचा विनयोग यासंबंधीचे अंदाजपत्रक आखून जलव्यवस्थापन कार्य युद्ध पातळीवर राबविले पाहिजे.
10. जल व्यवस्थापना विषयी ज्यांच्यासाठी लोक जागृती करणे गरजेचे आहे.

**संदर्भ**

1) विकासाच्या वाटा- डॉ. सुधीर भोंगळे
2) जलसाक्षरता- दिलीप गायकवाड
3) जलसाक्षरता – रूपाली परब
4) जलस्वराज कार्यपुस्तीका – महाराष्ट्र शासन
5) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम – माहिती पुस्तिका महाराष्ट्र शासन
6) ॲग्रोवन- सकाळ